सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

**सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३**

# महाराष्ट्र सुरक्षा दल अधिनियम, १९८६

**( दिनांक १३ नोव्हेंबर, २००६ पर्यंत सुधारित )**

**MAHARASHTRA ACT No. III OF 1987**

# THE MAHARASHTRA SURAKSHA DAL ACT, 1986

**( As modified upto 13th November 2006 )**

*

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, पुणे यांनी मुद्रित केले व संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई - ४०० ००४ यांनी प्रकाशित केले.

२००६

[ किंमत रु.५/- ]

# महाराष्ट्र सुरक्षा दल अधिनियम, १९८६
## (१९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३)

### अनुक्रमणिका

उद्देशिका


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ .. | १ |
| २. | व्याख्या .. | १ |
| ३. | दलाची रचना .. | २ |
| ४. | वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती व त्यांचे अधिकार .. | २ |
| ५. | दलाच्या सदस्यांचा वर्ग व पदश्रेणी (रँक्स) .. | ३ |
| ६. | दलाच्या सदस्यांची नियुक्ती .. | ३ |
| ७. | दलाचे वरिष्ठ अधिकारी किंवा सदस्य यांच्यासाठी ओळखपत्र .. | ३ |
| ८. | दलाचा सदस्य किंवा वरिष्ठ अधिकारी याच्या निलंबनाचा प्रभाव .. | ३ |
| ९. | निलंबित व्यक्तीने किंवा दलाचा वरिष्ठ अधिकारी किंवा सदस्य असण्याचे बंद झाले असेल अशा व्यक्तीने ओळखपत्र, शस्त्रे, इत्यादी परत करणे .. | ४ |
| १०. | दलाचे अधीक्षण, नियंत्रण व प्रशासन .. | ४ |
| ११. | दलाच्या सदस्यांची कर्तव्ये .. | ५ |
| १२. | वॉरंटाशिवाय अटक करण्याचा अधिकार .. | ५ |
| १३. | कोणत्या परिस्थितीत दलाचे वरिष्ठ अधिकारी व सदस्य बळाचा वापर करण्यास हक्कदार .. | ६ |
| १४. | वॉरंटाशिवाय झडती घेण्याचा अधिकार .. | ६ |
| १५. | अटक केल्यानंतर अनुसरावयाची कार्यपद्धती .. | ६ |
| १६. | दलातील अधिकारी व कर्मचारी हे नेहमी कामावर असल्याचे समजणे आणि ते राज्याच्या कोणत्याही भागात कामावर लावले जाण्यास पात्र असणे .. | ६ |

| कलमे | | पृष्ठे |
| --- | --- | --- |
| १७. | सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, औद्योगिक उपक्रम आणि वाणिज्यिक संघटना, इत्यादींकडे प्रतिनियुक्ती .. | ७ |
| १८. | दलातील कर्मचाऱ्यांना बडतर्फ करणे, काढून टाकणे, इत्यादी .. | ८ |
| १९. | अपील व पुनरीक्षण .. | ८ |
| २०. | कर्तव्यात हयगय करणे, इत्यादीबद्दल शिक्षा .. | ९ |
| २१. | इतर कोणत्याही कायद्याखाली केलेल्या अपराधाकरिता खटला भरण्यास बाध न येणे. .. | १० |
| २२. | दलातील अधिकारी व सदस्य यांना १९२२ चा अधिनियम क्रमांक २२ लागू करणे .. | १० |
| २३. | काही विशिष्ट अधिनियम दलाच्या सदस्यांना लागू नसतील .. | १० |
| २४. | दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या व सदस्यांच्या कृत्यास संरक्षण देणे .. | १० |
| २५. | नियम करण्याचा अधिकार .. | ११ |

# सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३[1]

[ महाराष्ट्र सुरक्षा दल अधिनियम, १९८६ ]

[ या अधिनियमास दिनांक ९ फेब्रुवारी, १९८७ रोजी राष्ट्रपतींची संमती मिळाली असल्यामुळे महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग चार, असाधारण यात दिनांक १२ फेब्रुवारी, १९८७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला ]

**महाराष्ट्र राज्यातील सरकारी जागांचे, तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, स्थानिक प्राधिकरणे आणि बँका यांच्या जागांचे अधिक चांगले संरक्षण करण्यासाठी व सुरक्षा ठेवण्यासाठी 'महाराष्ट्र सुरक्षा दल' नावाचे एक दल स्थापन करणे व त्याचे नियमन करणे यांकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यातील सरकारी जागांचे आणि महाराष्ट्र राज्यात असलेले सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, स्थानिक प्राधिकरणे आणि बँका यांच्या जागांचे अधिक चांगले संरक्षण करण्यासाठी व सुरक्षा ठेवण्यासाठी महाराष्ट्र सुरक्षा दल या नावाचे एक दल स्थापन करणे व त्याचे नियमन करणे यांकरिता तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्यांच्या सदतिसाव्या वर्षी याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, 'महाराष्ट्र सुरक्षा दल अधिनियम, १९८६' असे म्हणावे.

(२) त्याची व्याप्ती संपूर्ण महाराष्ट्र राज्यभर असेल.

(३) तो, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमील अशा क्षेत्रात व अशा दिनांकास अंमलात येईल आणि निरनिराळ्या क्षेत्रांसाठी निरनिराळे दिनांक नेमून देता येतील.

व्याख्या.

२. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,—

(क) "दल" याचा अर्थ, कलम ३ अन्वये स्थापन करावयाचे 'महाराष्ट्र सुरक्षा दल' असा आहे;

(ख) "दंडाधिकारी" याचा अर्थ,

(एक) महानगर क्षेत्राच्या संबंधात, महानगर दंडाधिकारी, आणि

(दोन) महानगर क्षेत्राबाहेरील क्षेत्राच्या संबंधात, प्रथम वर्ग न्याय दंडधिकारी, असा आहे;

(ग) "दलाचा सदस्य" याचा अर्थ, वरिष्ठ अधिकाऱ्याव्यतिरिक्त, या अधिनियमान्वये दलावर नेमण्यात आलेली अन्य व्यक्ती, असा आहे;

(घ) "पोलीस अधिकारी" याचा अर्थ, 'मुंबई पोलीस अधिनियम, १९५१' यात व्याख्या केल्याप्रमाणे पोलीस अधिकारी, असा आहे; १९५१ चा मुंबई २२.

---

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरिता महाराष्ट्र शासन राजपत्र भाग चार, असाधारण, दिनांक १८ जून, १९८६ पृ.३१७ पहा.

(ङ) ''विहित'' याचा अर्थ, या अधिनियमाखालील नियमांद्वारे विहित केलेले असा आहे;

(च) ''रक्षाधिकारी'' याचा अर्थ, दलाचा रक्षाधिकारी असा आहे आणि त्यात कलम ४ अन्वये नियुक्त केलेल्या उप-रक्षाधिकाऱ्याचा समावेश होतो;

(छ) ''दुय्यम अधिकारी'' याचा अर्थ, रक्षानिरीक्षक, रक्षा उपनिरीक्षक किंवा जमादार म्हणून दलावर नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, असा आहे;

(ज) ''वरिष्ठ अधिकारी'' याचा अर्थ, कलम ४ अन्वये नियुक्त करण्यात आलेला अधिकारी, असा आहे;

(झ) ''शासन'' या संज्ञेत, राज्य शासन व केंद्र सरकार या दोहोंचाही समावेश होतो.

(२) यात यापुढे वापरलेले व 'भारतीय दंड संहिता', 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' आणि 'मुंबई पोलीस अधिनियम, १९५१' यांमध्ये ज्यांची व्याख्या केलेली आहे असे शब्द व शब्दप्रयोग यांना त्या अधिनियमांमध्ये नेमून दिल्याप्रमाणे ते ते अर्थ असतील. १८६० चा ४५. १९७४ चा २. १९५१ चा मुंबई २२.

दलाची रचना.

३. (१) महाराष्ट्र राज्यातील शासकीय जागांचे, तसेच कलम १७, पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे राज्य शासनाकडून संरक्षण व सुरक्षा यांची ज्यांना गरज आहे अशा कोणतेही सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, स्थानिक प्राधिकरणे, बँका, किंवा यथास्थिति, औद्योगिक उपक्रम किंवा वाणिज्यिक संघटना यांच्या महाराष्ट्र राज्यात असलेल्या वास्तूंचे अधिक चांगले संरक्षण करण्यासाठी व तेथे सुरक्षा ठेवण्यासाठी 'महाराष्ट्र सुरक्षा दल' नावाचे एक दल राज्य शासन स्थापन करील व त्याची व्यवस्था ठेवील.

(२) या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने, राज्य शासन वेळोवेळी निश्चित करील अशा रीतीने या दलाची रचना करण्यात येईल व त्याची व्यवस्था ठेवण्यात येईल आणि शासन वेळोवेळी विहित करील इतके दलाचे वरिष्ठ अधिकारी व दलाचे सदस्य यांचे मिळून दल बनलेले असेल.

(३) दलाचे वरिष्ठ अधिकारी व दलाचे सदस्य यांची सेवाभरती, वेतन, निवृत्तिवेतन, भत्ते व सेवेच्या इतर शर्ती या, राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे वेळोवेळी निश्चित करील त्याप्रमाणे असतील :

परंतु, या कलमातील कोणताही मजकूर हा जो दलात प्रतिनियुक्तीवर आलेला असेल अशा कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याच्या किंवा इतर कोणत्याही अधिकाऱ्याच्या वेतनास, निवृत्तिवेतनास आणि सेवेच्या इतर शर्तीस लागू होणार नाही.

वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती व त्यांचे अधिकार.

४. (१) राज्य शासनास, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, पुढील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या प्रत्येक प्रवर्गातून एका किंवा अनेक व्यक्तींची नियुक्ती करता येईल :—

(क) रक्षाधिकारी;

(ख) उप-रक्षाधिकारी; आणि

(ग) राज्य शासन निश्चित करील अशा हुद्द्यांचे इतर वरिष्ठ अधिकारी.

(२) अशा रीतीने नियुक्त केलेला रक्षाधिकारी, उप-रक्षाधिकारी आणि प्रत्येक इतर वरिष्ठ अधिकारी हा, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये तरतूद करण्यात येईल अशा अधिकारांचा वापर करील आणि अशी कर्तव्ये व कामे पार पाडील.

(३) राज्य शासन आणि राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने रक्षाधिकारी हा, दलाचे वरिष्ठ अधिकारी म्हणून, त्यास योग्य वाटेल इतक्या, कोणत्याही इतर राज्य शासनाच्या किंवा केंद्र सरकार कर्मचाऱ्यांना, त्या शासनांकडून प्रतिनियुक्तीवर नियुक्ती करण्यासाठी घेऊ शकेल.

५. दलाच्या सदस्यांमध्ये दुय्यम अधिकाऱ्यांचे पुढील वर्ग व अन्य पदश्रेणी (रँक्स) असतील व त्यांचा अनुक्रम खाली नमूद केलेल्या क्रमाने असेल :— दलाच्या सदस्यांचा वर्ग व पदश्रेणी (रँक्स).

(क) दुय्यम अधिकारी :—

(१) रक्षा निरीक्षक

(२) रक्षा उप-निरीक्षक

(३) सुरक्षा जमादार

(ख) इतर पदश्रेणी :—

(१) प्रमुख रक्षक

(२) रक्षक.

६. कलम ५ मध्ये निर्देशिलेल्या दलाच्या सदस्यांची नियुक्ती ही, रक्षाधिकाऱ्याच्या अधिकारात असेल व तो या अधिनियमान्वये तयार केलेल्या नियमांनुसार त्या अधिकाराचा वापर करील : दलाच्या सदस्यांची नियुक्ती.

परंतु, या कलमान्वये असलेले नियुक्तीचे अधिकार उप-रक्षाधिकाऱ्याला आणि शासन यासंदर्भात आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अन्य वरिष्ठ अधिकाऱ्याला वापरता येतील.

७. (१) दलाच्या प्रत्येक वरिष्ठ अधिकाऱ्याला आणि सदस्याला त्याच्या नियुक्तीनंतर राज्य शासन याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विहित करील अशा नुमन्यातील आणि अशा वरिष्ठ अधिकाऱ्याची किंवा इतर कोणत्याही अधिकाऱ्याची मोहोर असलेले एक ओळखपत्र मिळेल. दलाचे वरीष्ठ अधिकारी किंवा सदस्य यांच्यासाठी ओळखपत्र.

(२) असे ओळखपत्र,

(क) त्यात जिचे नाव आहे अशी व्यक्ती कोणत्याही कारणामुळे दलाचा वरिष्ठ अधिकारी, किंवा यथास्थिति, सदस्य असण्याचे बंद झाल्यावर निष्प्रभावी होईल; किंवा

(ख) ओळखपत्राच्या धारकास पदावरून ज्या कालावधीसाठी निलंबित केले असेल त्या कालावधीत निलंबित राहील.

८. (१) दलाचा सदस्य किंवा वरिष्ठ अधिकारी हा, त्याला पदावरून ज्या कालावधीसाठी निलंबित केले असेल त्या कालावधीत या अधिनियमाखालील कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यास किंवा कोणतेही काम पार पाडण्यास किंवा कोणत्याही विशेषाधिकारांचा लाभ घेण्यास सक्षम असणार नाही. दलाचा सदस्य किंवा वरिष्ठ अधिकारी याच्या निलंबनाचा प्रभाव.

(२) अशी व्यक्ती निलंबनाच्या कालावधीत, दलाचा सदस्य, किंवा यथास्थिति, अधिकारी असण्याचे बंद होणार नाही आणि अशा कालावधीत, तिला पदावरून निलंबित केले जाण्यापूर्वी ती ज्या नियंत्रणाच्या आणि शिस्तीच्या नियमांस अधीन होती, त्याच नियमांस अधीन असण्याचे चालू राहील.

**निलंबित व्यक्तीने किंवा दलाचा वरिष्ठ अधिकारी किंवा सदस्य असण्याचे बंद झाले असेल अशा व्यक्तीने ओळखपत्र, शस्त्रे, इत्यादी परत करणे.**

९. (१) कोणत्याही कारणास्तव निलंबित करण्यात आलेल्या किंवा दलाचा सदस्य असण्याचे बंद झालेल्या व्यक्तीला, दलाचा सदस्य म्हणून तिची कर्तव्ये पार पाडण्याकरिता तिला पुरविण्यात आलेले ओळखपत्र, शस्त्रे, साजसरंजाम, कपडे व इतर वस्तू त्या स्वीकारण्याकरिता सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे अधिकार प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे ताबडतोब परत कराव्या लागतील.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदी **योग्य त्या फेरफारांसह** कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्याला लागू होतील.

(३) कोणत्याही अधिकाऱ्यास अधिकार प्रदान करण्याचा अधिकार,—

(क) दलाच्या सदस्यांच्या बाबतीत, रक्षाधिकाऱ्यांकडून बजावला जाईल, आणि

(ख) वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बाबतीत, राज्य शासनाकडून बजावला जाईल.

(४) कोणतीही व्यक्ती, तिला पुरविण्यात आलेले ओळखपत्र, शस्त्रे, साजसरंजाम, कपडे व इतर वस्तू, पोट-कलम (१) किंवा (२) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे परत करण्यात जाणीवपूर्वक हयगय करील किंवा तसे करण्याचे नाकारील तर, अपराध सिद्ध झाल्यानंतर तिला एक महिन्यापर्यंत असू शकेल एवढी कारावासाची, किंवा दोनशे रूपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाची, शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(५) कोणताही दंडाधिकारी, आणि त्यावेळी लेखी नमूद करण्यात येतील अशा विशेष कारणांकरिता रक्षाधिकारी किंवा उप-रक्षाधिकारी यांस, अशा प्रकारे परत न करण्यात आलेल्या कोणत्याही ओळखपत्राचा, शस्त्रांचा, साजसरंजामाचा, कपड्यांचा किंवा इतर वस्तूंचा शोध घेण्याकरिता व ते हस्तगत करण्याकरिता वॉरंट काढता येईल. अशा प्रकारे काढण्यात आलेल्या प्रत्येक वॉरंटाची, कलम ५ च्या खंड (क) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही दुय्यम अधिकाऱ्याकडून किंवा असे वॉरंट काढणाऱ्या दंडाधिकाऱ्याने, रक्षाधिकाऱ्याने किंवा उप-रक्षाधिकाऱ्याने तसा निदेश दिल्यास, कलम ५ च्या खंड (ख) मध्ये, निर्दिष्ट करण्यात आलेल्या दलाच्या अन्य कोणत्याही सदस्याकडून 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' च्या तरतुदींनुसार अंमलबजावणी करण्यात येईल. १९७४ चा

(६) एखाद्या व्यक्तीस पुरविण्यात आलेली कोणतीही वस्तु, रक्षाधिकाऱ्याच्या आदेशान्वये त्या व्यक्तीची मालमत्ता झाली असल्यास, या कलमातील कोणतीही गोष्ट तिला लागू होणार नाही.

**दलाचे अधीक्षण, नियंत्रण व प्रशासन.**

१०. (१) दलाचे अधीक्षण व त्याचे नियंत्रण करण्याचा अधिकार राज्य शासनाकडे निहित असेल व त्याच्या अधीनतेने दलाचे प्रशासन रक्षाधिकाऱ्याकडे निहित असेल व या अधिनियमाच्या आणि त्या अन्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींनुसार तो ते पार पाडील.

(२) राज्य शासन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा एका किंवा अनेक क्षेत्रांकरिता रक्षाधिकाऱ्याचे कोणतेही अधिकार व कामे दलाच्या उप-रक्षाधिकाऱ्यासमुद्धा अनुक्रमे वापरता व पार पाडता येतील, असा निदेश देऊ शकेल.

(३) पोट-कलमे (१) व (२) यांच्या तरतुदींच्या अधीन राहून शासनाच्या, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या, स्थानिक प्राधिकरणाच्या किंवा बँकेच्या कोणत्याही वास्तूच्या संरक्षणाचा व सुरक्षेचा प्रभार सोपविण्यात आलेला दलाचा प्रत्येक वरिष्ठ अधिकारी किंवा सदस्य हा, याबाबतीत राज्य शासनाकडून किंवा रक्षाधिकाऱ्याकडून देण्यात येतील अशा कोणत्याही निदेशांस अधीन राहून, शासन, सार्वजनिक

उपक्रम, स्थानिक प्राधिकरण किंवा बँक हे, प्रत्येकी त्यांच्या संबंधित वास्तूचे संरक्षण व सुरक्षा यांच्या संबंधात विनिर्दिष्ट करतील अशा त्यांच्या प्रधान अधिकाऱ्याचे किंवा अन्य कोणत्याही अधिकाऱ्याचे अथवा जेथे कलम १७, पोट-कलम (१) च्या परंतुकान्वये कोणताही औद्योगिक उपक्रम किंवा वाणिज्यिक संघटना यांची मागणी मंजूर करण्यात आली असेल त्याबाबतीत, अशा औद्योगिक उपक्रमाच्या किंवा वाणिज्यिक संघटनेच्या वास्तूंचे संरक्षण व सुरक्षा यांच्या संबंधात, रक्षाधिकारी विनिर्दिष्ट करील अशा, रक्षा उप-निरीक्षकाच्या दर्जाहून कमी दर्जा नसलेल्या वरिष्ठ किंवा दुय्यम अधिकाऱ्याचे एकंदर पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण याखाली, आपली कामे पार पाडील.

दलाच्या सदस्यांची कर्तव्ये.

**११.** प्रत्येक पर्यवेक्षण अधिकारी व दलाचा सदस्य यांची कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील,---

(क) आपल्या वरिष्ठ प्राधिकाऱ्याने व मुख्य अधिकाऱ्याने किंवा कलम १० च्या पोट-कलम (३) अन्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अन्य कोणत्याही अधिकाऱ्याने वैध रीत्या दिलेल्या सर्व आदेशांचे तत्परतेने पालन करणे व त्यांची अंमलबजावणी करणे;

(ख) त्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये असणाऱ्या शासकीय वास्तूंचे संरक्षण करणे व त्या सुरक्षित ठेवणे;

(ग) कलम १७ च्या पोट-कलम (१) अन्वये ज्या अन्य प्राधिकरणांच्या, उपक्रमांच्या, संस्थांच्या किंवा संघटनांच्या वास्तूंचे संरक्षण व सुरक्षा यांसाठी त्यास प्रतिनियुक्त करण्यात आले असेल त्या वास्तूंचे संरक्षण करणे व त्या सुरक्षित ठेवणे; आणि

(घ) खंड (ख) आणि (ग) मध्ये निर्देशिलेल्या वास्तूंचे अधिक चांगल्या रीतीने संरक्षण करता यावे व त्या सुरक्षित ठेवता याव्यात याकरिता हितावह असेल अशी इतर कोणतीही कृती करणे.

वॉरंटाशिवाय अटक करण्याचा अधिकार.

**१२.** दलाचा कोणताही वरिष्ठ अधिकारी किंवा सदस्य,---

(क) जी व्यक्ती कलम ११ च्या खंड (ख) आणि (ग) मध्ये निर्देशिलेल्या मालमत्तेच्या किंवा वास्तूच्या संबंधातील दखलपात्र अपराधाच्या प्रकरणी गुंतली असेल किंवा तिचा त्याच्याशी संबंध असेल किंवा जी अशा अपराधाच्या प्रकरणी गुंतली असल्याचा किंवा तिचा त्याच्याशी संबंध असल्याचा तिच्या बाबतीत वाजवी संशय असेल किंवा अशा एखाद्या परिस्थितीत ती आपली उपस्थिती लपविण्याकरिता सावधगिरी बाळगत असल्याचे आढळून येईल की, ज्यामुळे ती एखादा दखलपात्र अपराध करण्याच्या दृष्टीने अशी सावधगिरी बाळगत असावी, असे सकारण वाटू शकेल, अशा कोणत्याही व्यक्तीस;

(ख) कलम ११ च्या खंड (ख) आणि (ग) मध्ये निर्देशित करण्यात आलेल्या वास्तूत अपप्रवेश करताना आढळलेल्या कोणत्याही व्यक्तीस;

(ग) जी व्यक्ती, दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यास किंवा सदस्यास, तो असा अधिकारी, किंवा यथास्थिति सदस्य या नात्याने आपल्या कर्तव्याची अंमलबजावणी करीत असताना जेणेकरून त्यास प्रतिबंध होईल किंवा तो परावृत्त होईल याकरिता किंवा असा अधिकारी किंवा दलाचा सदस्य या नात्याने आपले कर्तव्य वैध रीत्या पार पाडताना, त्याच्या अनुषंगाने तो करीत असलेल्या कोणत्याही गोष्टीस प्रतिबंध करण्याच्या किंवा त्यापासून त्यास परावृत्त करण्याच्या उद्देशाने,---

(एक) स्वेच्छेने इजा करील किंवा स्वेच्छेने इजा करण्याचा प्रयत्न करील,

(दोन) अन्यायाने अडवणूक करील किंवा अन्यायाने अडवणूक करण्याचा प्रयत्न करील,

(तीन) हमला करील किंवा हमला करण्याची धमकी देईल,

(चार) फौजदारीपात्र बलप्रयोग करील किंवा तसे करण्याची धमकी देईल किंवा तसे करण्याचा प्रयत्न करील,

अशा कोणत्याही व्यक्तीस,

दंडाधिकाऱ्याच्या कोणत्याही आदेशाविना व वॉरंटाविना अटक करू शकेल.

कोणत्या परिस्थितीत दलाचे वरिष्ठ अधिकारी व सदस्य बळाचा वापर करण्यास हक्कदार.

**१३.** (१) दलाच्या एखाद्या वरिष्ठ अधिकाऱ्यास किंवा सदस्यास, स्वतःवर किंवा दलाच्या कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्यावर किंवा इतर कोणत्याही सदस्यावर हमला होण्याची वाजवी धास्ती वाटत असेल अथवा जिचे संरक्षण करणे व जी सुरक्षित ठेवणे हे, त्याचे कर्तव्य असेल अशी कोणतीही मालमत्ता किंवा व्यक्ती यांचे नुकसान होण्याची किंवा त्यांना इजा पोहोचण्याची वाजवी धास्ती वाटत असेल त्या बाबतीत, त्यास अशा गैरकृत्य करणाऱ्या किंवा हमला करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध किंवा गैरकृत्य करणाऱ्या किंवा हमला करणाऱ्या व्यक्तींस सहाय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही व्यक्तीविरुद्ध वाजवी मर्यादेपर्यंत आवश्यक असेल एवढ्या बलाचा वापर करता येईल.

(२) पोट-कलम (१) मधील तरतुदी, भारतीय दंड संहितेच्या १०० ते १०३ पर्यंतच्या कलमांमधील तरतुदींच्या भरीला असतील, त्यांना न्यूनकारी असणार नाहीत. १८६० चा ४५.

वॉरंटाशिवाय झडती घेण्याचा अधिकार.

**१४.** (१) कलम १२ मध्ये निर्देशित करण्यात आल्याप्रमाणे कोणताही अपराध घडला आहे किंवा करण्यात येत आहे व झडतीचे वॉरंट मिळवायचे झाल्यास अपराध्यास पळून जाण्याची किंवा पुरावा लपविण्याची संधी मिळाल्याशिवाय राहणार नाही असे, प्रमुख रक्षकाहून कमी दर्जाचा नसेल अशा, दलाच्या कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्यास किंवा कोणत्याही सदस्यास सकारण वाटत असेल तर, तो, अशा अपराध्यास अटकावून ठेवील व ताबडतोब त्याची अंगझडती व त्याच्याजवळ असलेल्या वस्तूंची झडती घेऊ शकेल व त्यास योग्य वाटेल तर, जिने अपराध केला आहे असे त्यास सकारण वाटत असेल अशा कोणत्याही व्यक्तीस अटक करू शकेल.

(२) 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' खालील झडत्यांशी संबंधित असणाऱ्या त्या अधिनियमाच्या तरतुदी शक्य तेथवर या कलमाखालील झडत्यांना लागू होतील. १९७४ चा २

अटक केल्यानंतर अनुसरावयाची कार्यपद्धती.

**१५.** या अधिनियमाखाली अटक करणारा दलाचा कोणताही वरिष्ठ अधिकारी किंवा सदस्य, अनावश्यक विलंब न लावता, अशा प्रकारे अटक करण्यात आलेल्या व्यक्तीस एखाद्या पोलीस अधिकाऱ्याकडे नेईल किंवा पोलीस अधिकाऱ्याच्या अनुपस्थितीत अशा व्यक्तीस, तिच्या अटकेस कारण झालेल्या परिस्थितीच्या अहवालासह जवळच्या पोलीस ठाण्यावर नेईल किंवा नेण्याची व्यवस्था करील :

परंतु, या अधिनियमान्वये या प्रमाणे अटक करण्यात आलेल्या व्यक्तीला, कलम १२ अन्वये अटक केल्याच्या ठिकाणापासून सर्वात जवळच्या पोलीस ठाण्यापर्यंतच्या व दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयापर्यंतच्या प्रवासासाठी आवश्यक असलेला अवधी वगळून, त्याच्या अटकेपासून २४ तासांच्या कालावधीत सर्वात नजिकच्या दंडाधिकाऱ्यांसमोर हजर केले जाईल आणि दंडाधिकाऱ्याने प्राधिकृत केल्याशिवाय अशा व्यक्तीला उपरोक्त कालावधीपेक्षा अधिक काळ हवालतीत अटकावून ठेवता येणार नाही.

दलातील अधिकारी व कर्मचारी हे नेहमी कामावर असल्याचे

**१६.** (१) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, दलातील प्रत्येक वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी हा, नेहमीच कामावर असल्याचे समजण्यात येईल आणि तो कोणत्याही वेळी महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागामध्ये कामावर लावला जाण्यास, तसेच त्याची बदली करून कामावर लावला जाण्यास पात्र असेल.

संमजणे आणि ते राज्याच्या कोणत्याही भागात कामावर लावले जाण्यास पात्र असणे.

(२) कलम १७ च्या पोट-कलम (१) मध्ये तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त इतर बाबतीत, दलातील कोणताही वरिष्ठ अधिकारी किंवा कर्मचारी हा, या अधिनियमाखालील त्याच्या कर्तव्यांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही नोकरीमध्ये किंवा पदावर स्वतःला नियुक्त करवून घेणार नाही.

सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम; औद्योगिक उपक्रम आणि वाणिज्यिक संघटना, इत्यादींकडे प्रतिनियुक्ती.

१७. (१) शासनाच्या कोणत्याही कार्यालयाकडून किंवा सार्वजनिक क्षेत्रातील कोणताही उपक्रम, स्थानिक प्राधिकरण, अथवा बँक यांच्या व्यवस्थापन संचालकाकडून किंवा त्यांचा कारभार पाहणाऱ्या अन्य कोणत्याही व्यक्तीकडून यथास्थिति, शासन, किंवा असा उपक्रम, किंवा यथास्थिति, प्राधिकरण यांच्या जागेचे संरक्षण व सुरक्षा यांसाठी दलातील कर्मचारी आवश्यक असल्याचे दर्शवणारी लेखी मागणी करण्यात आली असता रक्षाधिकाऱ्याने, अशा रीतीने करण्यात आलेली मागणी विचारात घेऊन, त्या संबंधात दलातील त्याला योग्य वाटतील इतक्या कर्मचाऱ्यांना, राज्य शासन निदेश देईल अशा कोणत्याही सर्वसाधारण निदेशांच्या अधीन राहून, प्रतिनियुक्त करणे विधिसंमत असेल व असे प्रतिनियुक्त करण्यात आलेले कर्मचारी शासन, उपक्रम किंवा प्राधिकरण किंवा बँक यांच्या संबंधित कार्यालयाच्या अखत्याराखाली राहतील :

परंतु, राज्य शासन, याबाबतीत काढण्यात येईल अशा कोणत्याही सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे, रक्षाधिकाऱ्यास असा कोणताही औद्योगिक उपक्रम किंवा उपक्रम वर्ग किंवा कोणतीही वाणिज्यिक संघटना किंवा संघटना वर्ग यांच्या बाबतीतील अशी कोणतीही मागणी स्वीकारण्याचा अधिकार प्रदान करू शकेल आणि त्यानंतर, अशी कोणतीही मागणी रक्षाधिकाऱ्याकडे आल्यावर तो, या कलमाच्या तरतुदींनुसार ती विचारात घेऊ शकेल.

**स्पष्टीकरण.**—— या कलमाच्या प्रयोजनार्थ, ''औद्योगिक उपक्रम किंवा उपक्रम वर्ग किंवा कोणतीही वाणिज्यिक संघटना किंवा वाणिज्यिक संघटना वर्ग'' याचा अर्थ,-

१९६१ चा महाराष्ट्र २४.

(एक) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये नोंदणी झालेल्या सहकारी संस्थेच्या मालकीचा किंवा तिने चालविलेल्या औद्योगिक उपक्रम किंवा उपक्रम वर्ग अथवा वाणिज्यिक संघटना किंवा वाणिज्यिक संघटना वर्ग; किंवा

(दोन) राज्य शासन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील असा भारताच्या संरक्षणाशी निगडीत अशा कोणत्याही प्रयोजनासाठी आवश्यक असलेल्या वस्तू किंवा सेवा यांची निर्मिती, उत्पादन, वितरण किंवा पुरवठा करण्याचे काम करणारा औद्योगिक उपक्रम किंवा उपक्रम वर्ग अथवा वाणिज्यिक संघटना किंवा वाणिज्यिक संघटना वर्ग असा आहे.

(२) पोट-कलम (१) अन्वये शासनाच्या, उपक्रमाच्या, प्राधिकरणाच्या किंवा संघटनेच्या कोणत्याही कार्यालयाकडे प्रतिनियुक्त करण्यात आलेल्या, दलातील कर्मचाऱ्यांसबंधीच्या अटी, शर्ती व सेवा-आकार या गोष्टी, राज्य शासन या संबंधात वेळोवेळी सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे ठरवून देईल त्याप्रमाणे असतील.

(३) पोट-कलम (१) अन्वये शासनाच्या, उपक्रमाच्या, प्राधिकरणाच्या किंवा संघटनेच्या कार्यालयाच्या संबंधात दलातील कर्मचाऱ्यांची प्रतिनियुक्ती आवश्यक करणारी परिस्थिती अस्तित्वात असण्याचे बंद झालेले आहे असे रक्षाधिकाऱ्याचे मत असेल किंवा अशा रीतीने प्रतिनियुक्त केलेल्या दलातील

कर्मचाऱ्यांना इतर कोणत्याही कारणामुळे परत बोलावणे आवश्यक असेल तर, रक्षाधिकारी, शासनाच्या संबंधित अधिकाऱ्यास किंवा शासनाचे ते कार्यालय, उपक्रम, प्राधिकरण किंवा संघटना यांच्या व्यवस्थापन संचालकास किंवा त्याचा कारभार पाहणाऱ्या व्यक्तीस सूचना दिल्यानंतर ते कर्मचारी परत घेऊ शकेल.

(४) शासनाच्या कार्यालयाचा हुकूमतदार अधिकारी किंवा उपक्रम, प्राधिकरण अथवा संघटना यांचा व्यवस्थापन संचालक किंवा त्यांचा कारभार पाहणारी व्यक्ती, रक्षाधिकाऱ्याला, एक महिन्याची लेखी नोटीस दिल्यानंतर, अशा रीतीने दलातील प्रतिनियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना परत बोलावण्यात यावे, असे फर्मावू शकेल आणि शासनाचा संबंधित अधिकारी, संबंधित उपक्रम, प्राधिकरण अथवा संघटना यांचा व्यवस्थापन संचालक किंवा त्यांचा कारभार पाहणारी व्यक्ती यांना अशा नोटिशीचा कालावधी समाप्त झाल्याच्या दिनांकापासून किंवा दलातील कर्मचाऱ्यांना कोणत्याही त्यापूर्वीच्या दिनांकापासून परत बोलावण्यात आले असेल तर, अशा त्यापूर्वीच्या दिनांकापासून त्या कार्यभारातून मुक्त केले जाईल.

दलातील कर्मचाऱ्यांना बडतर्फ करणे, काढून टाकणे, इत्यादी.

१८. भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३११ च्या तरतुदी आणि राज्य शासन या अधिनियमाखाली करील असे नियम, यांना अधीन राहून,——

(क) नियुक्ती प्राधिकारी असणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या मते दलातील जो कोणताही कर्मचारी त्याच्या कर्तव्यपालनांच्या बाबतीत बेपर्वा, हयगय करणारा, हेकेखोर किंवा भ्रष्ट असेल अथवा ती कर्तव्ये पार पाडण्यास अयोग्य असेल त्या कर्मचाऱ्यास बडतर्फ करू शकेल, काढून टाकू शकेल, निलंबित करू शकेल किंवा त्यास पदावनत करू शकेल; अथवा

(ख) कोणताही वरिष्ठ अधिकारी, दलातील जो कोणताही कर्मचारी आपले कर्तव्य निष्काळजीपणाने करीत असेल किंवा ते पार पाडण्यात हयगय करीत असेल किंवा जो स्वतःच्या कोणत्याही कृतीद्वारे स्वतःस कर्तव्यपालनासाठी अपात्र बनवील, अशा कर्मचाऱ्याला पुढील शिक्षांपैकी कोणतीही एक वा अनेक शिक्षा करू शकेल:——

(एक) भत्ते वगळून एक महिन्याच्या वेतनापेक्षा अधिक नसेल इतक्या कोणत्याही रकमेपर्यंतचा द्रव्यदंड किंवा वेतनमानात कपात;

(दोन) कोणत्याही प्राविण्याच्या पदावरून काढून टाकणे किंवा कोणत्याही विशेष वित्तलब्धीपासून वंचित करणे;

(तीन) कवायत, जादा पहारा, कष्टाची कामे (फटीग) किंवा इतर काम देणे :

परंतु, दलातील प्रमुख रक्षकापेक्षा वरच्या दर्जाच्या कोणत्याही कर्मचाऱ्याला उप-खंड (तीन) मध्ये विनिर्दिष्ट केलेली शिक्षा देण्यात येणार नाही आणि ज्या प्रकरणी अशी शिक्षा देण्यात येईल त्या प्रकरणी, कलम १९ च्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अपिलाची मुदत समाप्त होईपर्यंत त्या शिक्षेची अंमलबजावणी करण्यात येणार नाही.

अपील व पुनरीक्षण.

१९. (१) कलम १८ अन्वये देण्यात आलेल्या आदेशामुळे स्वतःवर अन्याय झाला आहे असे वाटणाऱ्या, दलातील कोणत्याही व्यक्तीला, असा आदेश तिला कळविण्यात आल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, उक्त आदेशाविरुद्ध विहित करण्यात येईल अशा अधिकाऱ्याकडे किंवा प्राधिकरणाकडे अपील दाखल करता येईल आणि पोट-कलम (४) च्या तरतुदींच्या अधीनतेने, उक्त प्राधिकाऱ्याचा त्या अपिलावर निर्णय अंतिम असेल :

परंतु, अपीलकारास अपील वेळेवर सादर करण्यास पुरेशा कारणामुळे प्रतिबंध झाला होता याबद्दल विहित प्राधिकरणाची खात्री पटली तर, ते प्राधिकरण उक्त तीस दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर अपील दाखल करून घेऊ शकेल.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,–

(एक) वादकालीन स्वरूपाच्या किंवा कोणत्याही शिस्तभंगाच्या कार्यवाहीमधील किंवा चौकशीच्या कामामधील सहाय्यक स्वरूपाच्या कोणत्याही आदेशाविरुद्ध ;

(दोन) शासनाने पोट-कलम (४) अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाविरुद्ध,
अपील करता येणार नाही.

(३) पोट-कलम (१) खाली दाखल केलेले अपील निकालात काढताना विहित अधिकारी किंवा प्राधिकरण विहित करण्यात येईल अशा कार्यपद्धतीचा अवलंब करील.

(४) राज्य शासनास, स्वतः होऊन किंवा स्वतःवर अन्याय झाला आहे असे वाटणाऱ्या व्यक्तीने यासंबंधात केलेल्या अर्जावरून, कलम १८, खंड (क) अन्वयेच्या किंवा या कलमाच्या पोट-कलम (१) अन्वयेच्या कोणत्याही कार्यवाहीचे अभिलेख मागवून घेऊन तपासता येतील आणि चौकशी केल्यानंतर किंवा अशी चौकशी करविल्यानंतर, या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन राहून, त्यावर त्यास योग्य वाटेल असा आदेश देता येईल :

परंतु, पोट-कलम (१) अन्वये अपीलासाठी विनिर्दिष्ट केलेली मुदत समाप्त झाल्याच्या दिनांकापासून, किंवा यथास्थिति, अपील दाखल केलेले असेल तर, अपिलाच्या कार्यवाहीमध्ये देण्यात आलेला आदेश संबंधित व्यक्तीला कळवल्याच्या दिनांकापासून साठ दिवस उलटून गेल्यानंतर पोट-कलम (१) अन्वयेच्या कोणत्याही कार्यवाहीचे अभिलेख मागवण्यात व तपासण्यात येणार नाहीत :

परंतु आणखी असे की, पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (४) खालील वाढीव शिक्षा देण्यासंबंधीच्या आदेशाचा प्रतिकूल परिणाम होणाऱ्या व्यक्तीस तिचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज असा कोणताही आदेश देण्यात येणार नाही.

**२०.** (१) कोणत्याही कर्तव्यभंगाबद्दल कोणताही नियम अथवा वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेला विधिसंमत आदेश याचा जाणूनबुजून भंग केल्याबद्दल किंवा त्याकडे दुर्लक्ष केल्याबद्दल दोषी असेल अशा, किंवा परवानगीशिवाय आपल्या पदाच्या कर्तव्यापासून माघार घेईल अशा, किंवा रजेमुळे अनुपस्थित असताना रजा संपल्यानंतर कामावर रुजू होण्यात वाजवी कारणावाचून कसूर करील अशा, किंवा दलातील एक कर्मचारी या नात्याने असलेल्या स्वतःच्या कर्तव्याखेरीज इतर कोणत्याही नोकरीमध्ये प्राधिकारावाचून स्वतःला गुंतवून घेईल अशा, किंवा भ्याडपणाबद्दल दोषी असेल अशा, दलातील प्रत्येक कर्मचाऱ्याला दोष सिद्ध झाल्यानंतर, कलम १८ मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींना बाध न येता, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल. कर्तव्यात हयगय करणे, इत्यादीबद्दल शिक्षा.

१९७४ चा २. (२) 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या कलमान्वये शिक्षापात्र असलेला अपराध दखली असेल.

२१. कलम २० मधील कोणत्याही गोष्टीमुळे दलाच्या कोणत्याही सदस्यावर कोणत्याही अन्य कायद्यान्वये खटला भरण्यास किंवा त्या कलमान्वये कोणत्याही अपराधासाठी कोणत्याही अन्य शिक्षेची तरतूद केली असेल तर, अशा अपराधाकरिता दलाच्या अशा कोणत्याही सदस्यावर खटला दाखल करण्यास प्रतिबंध होतो, असा त्याचा अर्थ लावण्यात येणार नाही : इतर कोणत्याही कायद्याखाली केलेल्या अपराधा-करिता खटला भरण्यास बाध न येणे.

परंतु, एका अपराधाबद्दल कोणाही व्यक्तीला दोन वेळा शिक्षा करता येणार नाही.

१९२२ चा २२. २२. 'पोलीस (सरकारविरुद्ध अप्रीतिभावना चेतवणे) अधिनियम, १९२२,' हा पोलीस दलाच्या सदस्यांना ज्याप्रमाणे लागू आहे, त्याप्रमाणे तो या दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना व सदस्यांना लागू होईल. दलातील अधिकारी व सदस्य यांना १९२२ चा अधिनियम क्रमांक २२ लागू करणे.

१९३६ चा ४. १९४७ चा १४. १९४८ चा ६३. २३. 'वेतन प्रदान अधिनियम, १९३६' किंवा 'औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७' किंवा 'कारखाना अधिनियम, १९४८' किंवा महाराष्ट्र राज्यामध्ये अंमलात असलेल्या औद्योगिक विवादविषयक तपासाशी किंवा समझोत्याशी संबंधित अशा कोणत्याही तत्सम कायद्यात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट दलाच्या सदस्यांना लागू होणार नाही. काही विशिष्ट अधिनियम दलाच्या सदस्यांना लागू नसतील.

२४. (१) कर्तव्यपालन करताना झालेल्या कोणत्याही कृत्याबद्दल, दलाचा कोणताही वरिष्ठ अधिकारी किंवा सदस्य यांच्या विरुद्ध लावलेल्या दाव्यात किंवा कार्यवाहीत, त्याच्याकडून घडलेले असे कृत्य, सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेशान्वये करण्यात आले होते असा युक्तिवाद त्याने केल्यास ते कायदेशीर ठरेल. दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या व सदस्यांच्या कृत्यास संरक्षण देणे.

(२) कृत्य करण्याबाबत निदेश देणारे आदेश दाखल करून, असा कोणताही युक्तिवाद शाबीत करता येईल आणि अशा प्रकारे तो शाबीत केला तर त्यानंतर, ज्याने असा आदेश काढला आहे त्या प्राधिकाऱ्याच्या अधिकारितेमध्ये कोणतीही उणीव असली तरीही, दलाचा वरिष्ठ अधिकारी किंवा सदस्य त्याच्याकडून घडलेल्या कृत्याच्या संबंधातील कोणत्याही दायित्वापासून मुक्त असेल.

(३) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाच्या किंवा त्याअन्वये तयार करण्यात आलेल्या नियमांच्या कोणत्याही तरतुदींना अनुसरून केलेल्या किंवा करावयाचे योजलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याविरुद्ध किंवा सदस्याविरुद्ध कायदेशीररीत्या करण्यात यावयाची कोणतीही कायदेशीर

कार्यवाही---मग ती दिवाणी असो किंवा फौजदारी असो---ज्या कृत्याबाबत तक्रार करण्यात आली ते कृत्य केल्यानंतर सहा महिन्यांच्या आतच दाखल करता येईल आणि त्यानंतर ती करता येणार नाही ; आणि अशी कार्यवाही व त्यातील कारणांची लेखी नोटीस संबंधित व्यक्तीला आणि तिच्या वरिष्ठ अधिकाऱ्याला, अशी कार्यवाही सुरू होण्यापूर्वी कमीत कमी एक महिना आधी देण्यात येईल. ज्या कृत्याबाबत तक्रार करण्यात आली असेल ते कृत्य घडल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यानंतर किंवा वर उल्लेखिलेल्याप्रमाणे त्याची नोटीस दिल्याशिवाय, कोणतीही कार्यवाही दाखल करता येणार नाही किंवा जर ती दाखल करण्यात आली असेल तर, अशी कार्यवाही खारीज करण्यात येईल :

परंतु, या पोट-कलमान्वये सहा महिन्यांच्या कालावधीची गणना करण्याच्या प्रयोजनासाठी, पोट-कलम (४) अन्वये राज्य शासनाची पूर्वमंजुरी मिळवण्याकरिता आवश्यक असलेला कालावधी वगळण्यात येईल.

(४) पदाचे कर्तव्य म्हणून आपले कर्तव्यपालन करताना किंवा तसे अभिप्रेत असल्याचे दिसत असताना दलाचा कोणताही वरिष्ठ अधिकारी किंवा सदस्य यांच्याकडून कोणताही अपराध घडला तर, अशा कोणत्याही अपराधाची कोणतेही न्यायालय राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीखेरीज दखल घेणार नाही.

नियम करण्याचा अधिकार.

२५. (१) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता, राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीच्या अधीनतेने, या अधिनियमाशी विसंगत नसतील असे नियम करता येतील.

(२) विशेषतः व पोट-कलम (१) अन्वये नियम करण्याच्या अधिकाराच्या व्यापकतेस बाध न येता, अशा नियमांत खालील सर्व बाबींसाठी किंवा त्यांपैकी कोणत्याही एका बाबीसाठी तरतूद करता येईल:--

(क) कलम ६ अन्वये दुय्यम अधिकारी व अन्य दर्जाचे कर्मचारी यांची नियुक्ती;

(ख) कलम १०, पोट-कलम (१) अन्वये दलाची देखरेख व प्रशासन ;

(ग) कलम १८, पोट-कलम (१) अन्वये कर्मचाऱ्याची बडतर्फी, निलंबन व दर्जा कमी करणे;

(घ) कलम १९, पोट-कलम (१) व (२) अन्वये अपील अधिकारी किंवा प्राधिकारी व अपिलाच्या कामकाजाची कार्यपद्धती;

(ङ) जी विहित करणे आवश्यक आहे किंवा विहित करता येईल अशी कोणतीही इतर बाब.

(३) या कलमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य असेल तितक्या लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अविधेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनांत, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील व असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून यथास्थिति अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच नियम अंमलात येईल किंवा येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यांमुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.